जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/११/२०२३
## दि.२९/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५८१/२०२३,भादविक ३९७,४३५,५०६(२),३४,महा.पो.का.क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३५ वर्ष,रा.सर्वे नं.४७/४ चरवड वस्ती,वडगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/११/२०२३ रोजी ११/३० वा.परफेक्ट ॲटोहब नावाचे दुचाकी व चारचाकी वाहनाचे गॅरेज व वॉशिंग सेंटर अंबाईदरा सिध्दी चौक,धायरी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांचेसोबत भागीदारी मध्ये अंबाईदरा,सिध्दी चौक धायरी,पुणे येथे परफेक्ट ॲटोहब नावाचे दुचाकी व चारचाकी वाहनाचे गॅरेज व वॉशिंग सेंटर चालवितात. सदर गॅरेज व वॉशिंग सेंटरच्या जागा मालकाचे भाऊ यांचेशी असलेल्या बिल्डींग बांधकामाच्या वादातुन यातील नमुद इसम व त्याचे दोन साथीदार यांनी आपसात संगनमत करून,दुचाकीवरुन येवुन गॅरेज मध्ये घुसुन,वॉचमन औदुंबर आदलीगे यांना धारदार हत्याराने जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करुन व त्यांचे कुटुंबास धारदार हत्याराचा धाक दाखवुन,गॅरेजच्या शेड मध्ये लावलेल्या सहा दुचाकी वाहनांना व चार चारचाकी वाहनांवर पेट्रोल ओतुन,आग लावुन गॅरेज परिसरात पार्क केलेल्या इतर सहा वाहनांचा काचा फोडुन नुकसान केले आहे. तसेच गॅरेजचे ऑफिसची काच फोडुन,आत मध्ये प्रवेश करुन,गॅरेज मधील सर्व सामानांची तोड फोड करुन,वॉचमन औदुंबर याने विरोध करुन देखील,त्यास धाक दाखवुन,टेबलच्या ड्रॉवर मध्ये ठेवलेला एक मोबाईल व एक टॅब तसेच ड्रॉवर मध्ये ठेवलेले रोख ४ हजार रुपये, टेबलावरील एक सीपीयु असा ऐवज जबरी चोरी करुन नेला आहे. तसेच वाहनांना आग लागल्या मुळे व काचा फोडल्याचा आवाज आल्याने परिसरातील बिल्डींगचे बाल्कनी मधुन पाहणाऱ्या नागरीकांकडे सदर इसमांनी त्यांचे हातातील धारदार शस्त्र हवेत फीरवुन,मी एक मर्डर करुन जेल मधुन बाहेर आलो आहे,कोणी आवाज काढलातर तुमची पण गेम करेल असे म्हणुन परीसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, प्रविण जाधव ८७८८८३१६३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५८२/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मो.वा.का.कलम १८४,१३४(अ)(ब), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | मसिहुद्दीन खान,वय ३६ वर्षे,रा.सर्वे नं.९८/३,शिळफाटा,कौसा,मुंब्रा,जि.ठाणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहनावरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/११/२०२३ रोजी रात्रौ ०४/३० वा.मुंबई-बेंगलोर हायवे रोडवर नवले ब्रिजजवळ,ओंकार इन हॉटेल समोर,साताऱ्याकडे जाणारी लेन,नऱ्हे,पुणे येथे रोडचे कडेला |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचा टेम्पो हा नमुद ठिकाणी रोडचे कडेला थांबविला असताना, कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने,हलगर्जीपणाने, वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन,बेदरकारपणे,भरधाव वेगाने चालवुन,फिर्यादी यांचे टेम्पोला |

|  |  |
|---|---|
|  | पाठीमागुन धडक देवुन,टेम्पो पलटी करून,त्यामध्ये कामगार अली मोहम्मद यार मोहम्मद,वय २१ वर्षे,मुं.दौरिहार,पोस्ट विशुनपुरवा,थाना,खेसरहा,विशुनपुर,सिध्दार्थनगर,राज्य उत्तर प्रदेश हा टेम्पोखाली दबला गेल्याने,त्यामध्ये तो गंभीर जखमी होवुन,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन तसेच सदर अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. अस्मिता लाड ८८३०५९७४४१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**